# पोलीस अधिक्षक,कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office,Gadchiroli
**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**
**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**


# वार्तापत्र

दिनांक २१/०३/२०१९

## वासामुंडी जंगल परिसरात पोलीस नक्षल चकमक

नक्षलवाद्यांच्या घातपाताचा कट उधळला

आज दिनांक २१ मार्च २०१९ रोजी मा. पोलीस अधिक्षक, श्री. शैलेश बलकवडे, मा. अप्पर पोलीस अधिक्षक, डॉ. हरी बालाजी, मा. उपविभाग पोलीस अधिकारी, एटापल्ली किरण कुमार सुर्यवंशी यांचे मार्गदर्शनाखीली उपविभाग एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या मौजा वासामुंडी जंगल परिसरात पहाटे ५:२० वा. दरम्यान जलद प्रतिसाद दलाचे जवान नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना नक्षलवाद्यांनी जवानांना जीवे मारण्याच्या उद्दंशाने पोलीसांच्या दिशेने अंदाधुद गोळीबार केला असता पोलीसांनी प्रत्युत्तरादाखल व स्वसंरक्षणार्थ नक्षलवाद्यांच्या दिशेने गोळीबार केला. यादम्यान नक्षलवाद्यांनी घनदाट जंगलाचा फायदा घेवुन तेथुन पळ काढला.

चकमकीनंतर सदर जंगल परिसराची पाहणी केली असता नक्षलवाद्यांनी घातपातच्या उद्देशाने स्वत:जवळ बाळगलेले २ ते २.५ कि.ग्रॅ. वजनाचा एक IED, अंदाजे १ कि.ग्रॅ. वजनाची गन पावडर, दोन जिवंत डिटोनेटर नक्षल वापरत असलेले पिट्टु व मोठ्या प्रमाणात नक्षल साहित्य जप्त करण्यात आले.

सदर घटनेनंतर नक्षलविरोधी अभियान तिव्र करण्यात आले आहे.

